# नव राष्ट्र

# 'एव्हीएन'वर थेरपीने केले यशस्वी उपचार

पुणे, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. भारताच्या पहिल्या नैसर्गिक अस्थि पेशी (बोन सेल) थेरपीसह पुण्यातील निवासी रुग्णांवर रिग्रो बायोसायन्सेस या भारतीय जैवतंत्रज्ञान कंपनीने विकसित केलेल्या डीजीसीआय मान्यताप्राप्त ऑसग्रोचा वापर करून पुण्यातील जहांगीर हॉस्पिटल येथे एव्हीएन (अव्हॅस्क्युलर नेक्रोसिस ) या आजाराने त्रस्त असलेल्या रुग्णांवर यशस्वी उपचारपद्धती करण्यात आली आहे. एव्हीएन ( अव्हॅस्क्युलर नेक्रोसिस) या आजारवर करण्यात येणारी ऑसग्रो ही पेशीवर आधारीत उपचार पद्धती आहे. हि उपचार पद्धत सर्वात प्रथम पुण्यातील ५७ वर्षीय पुरुष व ३६ वर्षीय महिलेवर करण्यात आली आहे. अव्हॅस्क्युलर नेक्रोसिस ची मुख्य कारणे प्रामुख्याने व्यसन, चुकीची औषध पद्धती, तसेच हाडांची झीज झाल्यामुळे होते. ऑसग्रोसाठीची शस्त्रक्रिया हि अस्थिप्रत्यारोपण शस्त्रक्रियेच्या तुलनेने स्वस्त आणि वेदनारहित आहे. एव्हीएनच्या रुग्णांवर उपचार केलेल्या रिग्रो बायोसायन्सेसच्या नेटवर्कमधील अस्थिविकारतज्ज्ञांनी हे तंत्र सुरक्षित व परिणामकारक असल्याचा निर्वाळा दिला.




## भारतातील पहिलीच उपचारपध्दती

संपदा यांच्या नोंदी आणि रिपोर्ट्स पाहिल्यानंतर जहांगीर हॉस्पिटलमधील युनिट प्रमुख आणि वरिष्ठ सांधे प्रत्यारोपण शल्यविशारद डॉ. आशीष अरबाट म्हणाले की "या प्रकरणात संपदा या तरुण महिला होत्या आणि त्या बाळाचे नियोजन करत होत्या. पण गुंतागुंत, वेदना आणि अस्वस्थपणामुळे त्या हे पाऊल उचलू शकत नव्हत्या. कालांतराने त्यांचा आजार बळावला आणि त्यांना चालणे, बसणे किंवा दैनंदिन कामे करणेही अशक्य होऊ लागले. त्यांच्या क्ष-किरण रिपोर्टमध्ये त्यांच्यात एव्हीएनची सुरुवातीची लक्षणे दिसून आली आणि ऑसग्रो तंत्राने उपचार करण्याच्या एका सत्राने त्यांच्या आजारावर उपचार करणे शक्य होते .अरबाट म्हणाले की बहुतेकांना एव्हीएन या हाडांच्या आजाराविषयी आणि त्यावरील उपचारांविषयी काहीही माहिती नसते पण एव्हीएन म्हणजे बोन डेथ सन्ड्रोम या आजाराची संवेदनशीलता, त्याबद्दल जागरुकता निर्माण करण्यासाठी आम्ही नेहमीच तत्पर असतो. आमच्याकडे अव्हॅस्क्युलर नेक्रोसिस आजारावर यशस्वीरीत्या शस्त्रक्रिया करण्यात आली त्यामुळे आज रुग्ण पूर्वपदावर आले आहेत.